The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# महाराष्ट्रातील प्रमुख संत - जीवन आणि साहित्य

**डॉ.अतुल पाटील**
मू.जे.महाविद्यालय, जळगाव

महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायांचा संबंध प्राचीन वेदकाळापर्यंत आढळतो. परंतु भक्तीप्रवाह म्हणून त्या संप्रदायांचा उल्लेख मध्ययुगीन कालखंडात केला जातो. या कालखंडात नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, महानुभव संप्रदाय, दत्त संप्रदाय हे प्राचीन संप्रदाय निर्माण झाले आहेत. मराठी भक्तीपरंपरेने सर्वच संप्रदायांना सामावून घेतले आहे. प्रत्येक संप्रदायांचे तत्वज्ञान परस्परपूरक आहे. या संप्रदायांमध्ये उपासनापद्धती, आचारपद्धती, वेशभूषा, तत्त्वज्ञान यामध्ये वेगळेपणा असला तरी सगळ्यांना ईश्वराचा अनुभव सारख्याच स्वरूपात अभिप्रेत आहे. याच एकात्मतेच्या भावनेतून महाराष्ट्रात वेगवेगळ्या संप्रदायांचे आपापसात सामंजस्य राहिले आहे. भक्तीपरंपरेत संप्रदायांचे भेद मोठ्या प्रमाणावर मानले गेले नाहीत. वेगवेगळ्या जातींचे भेदही नाहीसे झाले. या संप्रदायांमध्ये फक्त भक्तीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संप्रदाय भेद आणि जातीपातींचे भेद या भक्तीपरंपरेने दूर केले. तसेच धर्माचे भेदही दूर झाले होते. मराठी संतांच्या परंपरेत कितीतरी मुस्लिम संत दिसतात. जाती, धर्म आणि संप्रदाय यांचे भेद संतांनी मानले नाहीत. आणि साध्या निर्मळ भक्ती, प्रेमाने भारावलेल्या सर्वच जाती-धर्मांच्या, वेगवेगळ्या समाजाच्या स्तरांमधील माणसांना भक्तीच्या झेंड्याखाली एकत्र जमवले. त्यातूनच सामान्य लोकजीवनाच्या अनुभवांशी एकरूप असणारे साहित्य निर्माण झाले. हेच साहित्य स्वतःच्या मराठी भाषेचे सामर्थ्य, सौंदर्य आणि अनुभवांची संपन्नता दाखवणारे आहे.

महाराष्ट्रातील वारकरी पंथ किंवा भागवत संप्रदाय हा अनेक पंथांपैकी एक होता असे आपण मानतो. परंतु तो समाजव्यापी असा भागवतधर्म होता असे म्हणावयास हरकत नाही. संतांचा भागवत धर्म आणि महाराष्ट्र धर्म यांची एकरूपता झालेली दिसते. याविषयी न्यायमूर्ती रानडे म्हणतात की,'ही चळवळ ज्ञानदेवांचा जन्म झाल्यापासून ते गेल्या शतकाच्या अखेरीपर्यंत चालू राहून सदगुणांची हळूहळू वाढ झाली. या देशात प्राकृत भाषेत एक बहुमोल वाड्मय या चळवळीमुळेच आम्हाला उपलब्ध झाले ज्ञातीजन्य श्रेष्ठत्वाच्या वेडगळ कल्पनांचा जोरही या वाङ्मयानेच कमी झाला. शूद्र वर्णाला परमार्थिक शिक्षण देऊन त्याचे समाजामध्ये महत्त्व वाढवून ब्राह्मणांच्या तोडीस या चळवळीने आणून बसविले. कुटुंब संबंधाने पावित्र्य प्राप्त होऊन स्त्रियांची योग्यता वाढली. परधर्मी सत्तेच्या ठिकाणी एकजुटीची येतद्देशीय सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याच्या महतकृत्यात पुढारीपण घेण्यास महाराष्ट्र देशाची तयारी चळवळीने करून दिली, तशी तयारी हिंदुस्थानातील कोणत्याही प्रदेशाची झाली नाही. महाराष्ट्र धर्माची मूलतत्त्वे आम्हास हीच दिसतात.'महाराष्ट्रामध्ये संतसाहित्य निर्माण झाले ते कोणत्याही शुद्ध वाड्मयीन अशा प्रेरणांनी नव्हे तर फक्त ईश्वराची भक्ती करावी, ही त्या मागची प्रेरणा होती. त्यामागे कोणतीही वैयक्तिक महत्त्वकांक्षा नव्हती. किंवा व्यक्तिगत यश मिळावे अशी अपेक्षाही नव्हती. ज्ञानेश्वरांनी ज्या भागवत संप्रदायाचा पाया घातला. त्या संप्रदायात समाजाच्या सर्व स्तरातील भक्त

सहभागी झाले. आजवर ज्या लोकांना माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळाली नव्हती, असे माणसे या संप्रदायात भक्त म्हणून दाखल झाले होते.आणि त्यांना भक्तीच्या पातळीवर समानतेचा अनुभव आलेला होता. या संतांनी आपल्या दैवताशी भक्त म्हणून संवाद केला. आपली सुखदुःखे त्याला सांगितली. संतमेळ्यात जो आनंद मिळाला तो त्याला सांगावसा वाटला. भक्तीच्या मार्गावरच आपला प्रवास कसा होत गेला हे सुद्धा ईश्वराला सांगावेसे वाटले. म्हणून त्यातूनच बहुतेक संतांची अभंग रचना झाली असावी. असे अभ्यासावरून म्हणता येते.

संत साहित्य निर्माण झालेलं तो कालखंड यादव राजवटीतील असल्यामुळे तत्कालीन समाजजीवन तेराव्या शतकात कसे होते. याची पार्श्वभूमी आपण थोडक्यात समजून घेऊ शकतो. वर्णश्रमाची घट्टपकड असलेला समाज जातीभेद काटेकोरपणे पाळत होता. न्यायव्यवस्था कोलमडण्याच्याअवस्थेत, बेतात असलेली आर्थिक अवनती, सामाजिक चरित्राचा ऱ्हास आणि स्थिरता नसणे. या कारणाने समाज एकप्रकारे हालाखीचे जीवन जगत होता. कोणताही दिलासा देणारे नेतृत्व सामाजिक किंवा राजकीय क्षेत्रात आढळत नव्हते. या अशा परिस्थितीतून भरकटलेल्या समाजाला बाहेर काढण्याची तळमळ संतांनी व्यक्त केली. धर्म हे त्या काळातले समाजजीवनाचे केंद्रच होते. म्हणून धर्माचे खरे स्वरूप सामान्य जनतेला दाखवून द्यावे आणि मानवता दाखवणारा भक्तीचा मार्ग हेच चारित्र्यशुद्धीचे साधन बनवावे. असे संतांना वाटले असावे. संतांनी आपल्या वाणीतून परमार्थाच्या क्षेत्रातील परिवर्तनासाठी नवीन मार्ग शोधला. संत सामाजिक कायद्यांमध्ये बदल करू शकत नव्हते. पण ज्या धर्मसंस्थांशी सामाजिक व्यवहार संबंधित होते, त्या धर्मसंस्थेला शुद्ध करण्याचा प्रयत्न संतांनी केल्याचे दिसते. समाजातील विविधता मिटवून एकता, त्यातून समानता प्रस्थापित करण्याची उर्मी संतांची होती. त्यामुळेच संतांनी आधी व्यक्तीचे चारित्र्य सुधारले पाहिजे म्हणून चारित्र्य शुद्धीचा आग्रह धरला. भक्तीचा सोपा मार्ग त्यांच्या साहित्याने दाखवला. कर्मकांड दूर सारून सर्व जनतेला सुलभ होईल अशा ईश्वरी उपासनेची रीत संतांनी समाजमनावर घालून दिलेली दिसते. आचार आणि विचारांमधील विकृती दूर करून भक्तिमार्ग स्वीकारण्यासाठी लोकांना सन्मार्ग दाखवला या संतांचा भक्तीचा मार्ग लोकांना संसारापासून दूर नेणारा नव्हता. संसारात राहूनच परमार्थ साधन करावे असा उपदेश संत साहित्यातून आलेला दिसतो. या संतांची भक्तीची कल्पना सोप्या पद्धतीची, कर्मकांडाला आग्रह न धरणारी आणि नैतिक मूल्यांच्या पायावर उभी असलेली होती. त्यामुळेच चारित्र्यशुद्धी आणि धर्मशुद्धी घडून येण्यास खूप मोठी मदत झाली. माणूस आणि देव यांचा प्रत्यक्ष संबंध संतांनी प्रस्थापित केला. भक्तीचा अधिकार सर्वांना आहे. असे संतांनी दाखवून दिले. त्यामुळेच समानतेचे तत्व परमार्थापुरते तरी अमलात येण्यास मदत झाली. या भागवत संप्रदायांमध्ये अनेक शूद्र व स्त्रिया यांना वारकरी संप्रदायात मनाचे स्थान मिळाले. त्यामुळे समाजातील विषमतेची दरी कमी झाली. देव सर्वांसाठी एकच आहे. असे संतांनी अनेक रचनांमधून सांगण्याचा प्रयत्न केला. संतांनी सामान्य माणसापर्यंत ज्ञान पोहोचावे यासाठी आग्रहाची भूमिका घेतली. आणि लोकांच्या बोलीभाषेत साहित्य निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. ह्या रचना सर्वांना समजतील अशा परिचित छंद, वृत्तांचा वापर करून सोप्या केल्या. त्यांनी आपल्या साहित्यातून जे विचार मांडले ते विचार प्रसार करण्यासाठी

सामान्य माणसांच्या आयुष्यात रुजलेली लोकसंस्कृतीची माध्यमे वापरली. त्यामध्ये कीर्तने, प्रवचन, भारुडे, गवळणी, स्तोत्रे यांच्या माध्यमातून संतांनी सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला त्यामुळेच संतसाहित्य लोकप्रिय झाले. वारकरी संप्रदायातले संत कवी म्हणून ओळखले जाणारे बहुतेक सर्वच संत वारकरी पंथात समाविष्ट होतात. या सर्वांनी आपल्या मनाचे भाव व्यक्त करताना रचना केलेल्या आहेत. तत्त्वज्ञानाचा प्रसार, त्या तत्त्वज्ञानाचे व्यक्तिगत पातळीवर स्वतःला झालेले आकलन यांच्याबरोबरच लोकरंजन आणि समाजाचे परिवर्तन ही सुद्धा त्या संत कवितेमागील प्रेरणास्थाने होती. या रचनांचे मुख्य बलस्थान लोकप्रबोधन हे होते. आज शेकडो वर्षे झाली तरी जनमानसावरील त्या संत साहित्याच्या रचनांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळतो.

**संत ज्ञानेश्वरांचे वाड्मयीन कार्य-**

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव चांगदेव पासष्टी आणि स्फुट अभंग अशा प्रकारच्या रचना केल्या आहेत. या रचनांमध्ये महत्त्वाची रचनाकृती म्हणून 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाकडे पाहिले जाते. या ग्रंथाला भावार्थदीपिका असेही म्हटले जाते. भगवद्गितेवर ज्ञानेश्वरांनी केलेले भाष्य किंवा टीका म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. या ग्रंथाची रचना इ.स.वी सन 1290 मध्ये झाली. भगवद्गीतेची रचना संस्कृत भाषेतून आहे. मात्र सामान्य जनतेला संस्कृत भाषेचे ज्ञान अवगत नसल्यामुळे या ग्रंथांमधील ज्ञान मिळू शकत नव्हते. या ग्रंथात ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग यांचे तत्त्वज्ञान सामान्य माणसांपर्यंत त्यांच्या स्वतःच्या भाषेतून पोहोचवावे या हेतूने संत ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेवरील हे मराठी भाष्यरचले. 9000 ओव्यांचा हा ग्रंथ तत्त्वज्ञानाच्या आधारावर रचला गेलेला आहे. या ग्रंथाची भाषा अतिशय रसाळ सर्वांना समजेल अशा दृष्टांतांनी युक्त आहे. ज्ञानेश्वरांनी गीतेचे तत्त्वज्ञान मराठी भाषेत स्वतंत्र प्रतिभेच्या बळावर आणले. त्यामध्ये काव्यात्मक असे चिंतन आलेले आहे. रचना करताना जीवनमूल्यांचे अचूक दर्शन या ग्रंथातील प्रत्येकओवीत भरलेले आहे. ज्ञानेश्वरांची शैली उपमा, उत्प्रेक्षा या अलंकारांनी युक्त आहे. लोकभाषेतील शब्द आणि लोकजीवनामधल्या समर्पक दृष्टांत यामुळे या ग्रंथाचा सुबोधपणा जाणवतो. हा ग्रंथ त्यांनी एकांतात बसून लिहिलेला नाही तर, सर्वसामान्य श्रोत्यांना त्यांनी ऐकवला आहे. म्हणून या ग्रंथाचे स्वरूप तत्त्वचर्चेचेअसले तरी मोठ्या रसाळपणे आपलेपणाने चाललेला श्रोत्यांशी संवाद अशा स्वरूपाची रचना आहे. त्यांनी श्रोत्यांना उद्देशून केलेली संभाषणे या ग्रंथात आहेत. या ग्रंथातील 'मंगलाचरणे' हा ही स्वतंत्र अभ्यासाचा विषय असला तरी तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा सुंदर मेळ पाहायला मिळतो. प्रारंभी 'गणेशवंदना' करून अतिशय प्रसिद्ध अशा कल्पना समाविष्ट केलेल्या आहेत. या ग्रंथात 'पसायदान' हे ज्ञानेश्वरांच्या उदार मानवतावादी दृष्टीचा अनुभव देणारे आहे. सर्व कल्याणाच्या भावनेतून विश्वात्मकता पसायदानातून जाणवते. सर्व प्राणीमात्रांचे सुख, कल्याण त्यांनी अधोरेखित केले आहे.

**अमृतानुभव**

'अमृतानुभव' हा ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या नंतर इ.स.वी. सन 1292 मध्ये निर्माण झालेला आहे. या ग्रंथाची रचना करण्याची सूचना संत ज्ञानेश्वरांना निवृत्तीनाथांनी केली असे या ग्रंथ निर्माण

करण्याविषयी सांगितले जाते. हा ग्रंथ ज्ञानेश्वरी प्रमाणेच ओवीछंदात रचला गेलेला आहे. त्यामध्ये शिवशक्तीचे ऐक्य, अज्ञानाचा विनाश आणि ज्ञानाच्या पलीकडची अवस्था याविषयीचे विवेचन आलेले आहे. या ग्रंथाचे तत्त्वज्ञान अतिशय श्रेष्ठ दर्जाचे आहे. या ग्रंथातून गुरुभक्ती, आत्मविश्वास, विनय आणि कर्तृत्व यांचे दर्शन घडते.

**चांगदेव पासष्टी**

'चांगदेवपासष्टी' हा ग्रंथ 65 ओव्यांचे लघुकाव्य आहे. पत्ररूपाने केलेल्या संवादासारखे या लहानशा ग्रंथाचे स्वरूप आहे. संत ज्ञानेश्वरांनी चांगदेवांशी केलेला संवाद या ग्रंथात आहे. विश्वाचे स्वरूप या ओव्यांमधून ज्ञानेश्वरांनी उलगडले आहे. विश्वामध्ये विविधता दिसत असली तरी शेवटी सर्व गोष्टी ह्या एकच आहेत. एकाच चैतन्याची ती विविध रूपे आहेत. याची प्रचिती त्यांनी अनेकदृष्टांत आणि उदाहरणे देऊन सांगितली आहे.

**अभंग**

संत ज्ञानेश्वरांचे 'अभंग' हे मौखिक परंपरेने आल्याने त्यांची भाषा बदलत गेलेली दिसते. जुन्या तेराव्या शतकातील मराठी भाषेपेक्षा ती जरा नवी वाटते. ईश्वर भेटीसाठी लागलेली तळमळ, बेचैनी, प्रपंच विषयीचा अलिप्तपणा आणि ईश्वराच्या विराहने होणारे दुःख याविषयीचे चिंतन त्यांच्या अभंगातून आलेले दिसते. मनात दाटून आलेली भक्ती आणि देवाची आळवणी आणि देवाबरोबर एकरूप झाल्याचा आनंदही मोठ्या आनंदाने त्यांच्या अभंगातून व्यक्त झाला आहे.

**संत नामदेव यांचे वाङ्मयीन कार्य**

संत नामदेवांच्या 'अभंगवाणी' प्रसिद्ध आहे. नामस्मरण आणि कीर्तन या दोन माध्यमांच्या आधारे अतिशय लोकप्रिय अशा रचना संत नामदेवांनी प्रसारित केल्या. संत नामदेवांनी कीर्तनाची गोडी वाढवणारे अभंग रचले. सोप्या भाषेत रचना केल्यामुळे सहज लोकांच्या मुखतगत त्या रचना झाल्या. त्यात हरिपाठाचे अभंग, आत्मचरित्रात्मक अभंग अशा रचना आहेत. त्यांच्या अभंगांमध्ये भक्तीची विविध रूपे पहावयास मिळतात. विठ्ठलाचा विरह, ओढ, त्याच्या भेटीच्या आनंदाचे रूप ही सगळी वर्णने संत नामदेवांनी सार्थपणे साकारली आहेत. त्यांच्या रचनांमध्ये भक्तीची आसक्ती आहे. जिव्हाळा आहे. पंढरपूर या देवस्थानाविषयी ओढ आहे.'शतकोटी तुझे अभंग करीन' अशी प्रतिज्ञा ते विठ्ठलासमोर करतात. देव दगडामध्ये नाही तर तो माणसांमध्ये आहे. असा नामदेवांचा अनुभव आहे. या मनामधल्या देवाची भक्ती करायची असेल तर मन शुद्ध असायला हवे. अशी त्यांची भूमिका आहे.

**संत एकनाथ यांचे कार्य**

'भावार्थ रामायण', भागवताच्या एकादश स्कंधावर 'रुक्मिणी स्वयंवर', 'भारुडे', 'गौळणी', 'अभंग', 'आरत्या' असे अनेक प्रकारचे वाङ्मय संत एकनाथांनी निर्माण केले. त्यांच्या रचनांमधून लोकहिताची तळमळ प्रतिबिंबित होते. त्यांच्या वाङ्मयाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रपंच आणि परमार्थ यांचा सुरेख संगम साधला गेला आहे. संसारातल्या माणसाला रुचेल, पचेल, आपलासा वाटेल अशा अध्यात्माचा विचार त्यांनी आपल्या रचनांमधून मांडला. त्यांच्या भाषेमध्ये गांभीर्य, प्रौढपणा, विपुलता आहे. संत एकनाथांच्या रचनांमध्ये वीररस, करूणरस पाहावयास मिळतो. त्यांच्या

'रुक्मिणीस्वयंवर' या आख्यानकाव्यामध्ये त्यांची शैली पहावयास मिळते. एकनाथांनी अख्यान या वाड्मयप्रकाराचा ओघ कथाकाव्याकडे वळवला. त्याला व्यवहारी सामान्य माणसांच्या जवळ जाणारे स्वरूप प्राप्त करून दिले. त्यांनी भारुडे, गौळणी अशा प्रकारच्या काव्यरचना केल्या. समाजामधल्या विविध व्यवसाय करणाऱ्या सामान्य माणसांचे जीवन त्यांनी पाहिले होते. त्यातूनच अनेक प्रसंगांवर, व्यवसायांवर त्यांनी परमार्थिक रूपके साकार केली. सामान्य माणसांपर्यंत तत्त्वज्ञान सहजपणे पोहोचवण्याचं ते एक उत्तम साधन ठरले. तत्त्वज्ञानाची बैठक असलेले विचार, लोकजीवनाशी जवळीकता आणण्यासाठी प्रभावी साधन म्हणून एकनाथांनी भारुडे, जोहार यासारखे काव्य रचले. त्यांनी ज्ञानेश्वरीची पाठशुद्ध आवृत्ती काढली त्यांचे व्यक्तिमत्व शांत, सौम्य, प्रेमळ, सौजन्यशील होते.

**संत तुकाराम**

संत तुकाराम हे दुष्ट प्रवृत्तींवर हल्ला करणारे तर भक्तीने भरलेले अतिशय मृदू असे व्यक्तिमत्व होते. परखड आणि प्रसंगी हळुवारही त्यांच्या रचना प्रसिद्ध आहेत. ते म्हणतात 'मऊ मेना होऊनही आम्ही विष्णुदास, कठीण वज्रासी भेदू ऐसे' असे स्वतःचे वर्णन ते करतात. समाजातील सर्वच घातक रूढींचा, प्रथांचा ते निषेध करतात. सर्व माणसे सारखी आहेत. समाजात डौल मिरवणारी माणसे लबाड आणि ढोंगीसाधू यांच्यावर ते हल्ला करतात. त्यांच्या अभंगातून अनिष्ट अशा सर्व गोष्टींवर आघात केलेला दिसतो. आणि कल्याणकारी अशा भक्तीचा मार्ग दाखवलेला दिसतो. ते म्हणतात 'देव हा देवळामध्ये नाही तर तो समाजातल्या दीनदुबळ्यांच्या सेवा करणाऱ्या संत सज्जनांमध्ये आहे.''जे का रंजले गांजले; त्यांशी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा, तेथेची देव जाणावा' असे संत तुकाराम म्हणतात. माणसाच्या वैयक्तिक चरित्राच्या शुद्धतेबरोबर त्याचं समाजात वावरतानाही चारित्र्य शुद्ध असावे असे सांगतात. माणसांमधील सात्विक चांगुलपण जागे केले जावे. त्याचबरोबर अन्यायकारककृती, दृष्टबुद्धी यांचा नाश केला पाहिजे. असे त्यांच्या रचनांमधून समोर येते.

महाराष्ट्रातल्या सर्वच संतांच्या कृतीतून वारकरी संप्रदायाने भागवत झेंड्याखाली विठ्ठलभक्तीसोबत समाजप्रबोधनाचे व्रत घेतले होते. याची साक्ष पटते.

संदर्भ ग्रंथ -

१. र. बा. मंचरकर, धर्म संप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाड्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्र.आ.२०००.
२. रा.र. गोसावी, पाच भक्तीसंप्रदाय,मेहता पब्लिशिंग हाउस पुणे.१९९८.
३. शेणोलीकर, प्राचीन मराठी वाड्मयाचे स्वरूप, मोघे प्रकाशन, कोल्हापूर,१९९१.
४. ल.रा.नसिराबादकर, प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास,फडके प्रकाशन, कोल्हापूर.
५. वि.भी. कोलते, प्राचीन साहित्याच्या अंतरंगात,स्नेहवर्धन पब्लिकेशन,पुणे.
६. अ.ना.देशपांडे, प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास,व्हीनस प्रकाशन, पुणे.